# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

## संयुक्त कृषि संशोधन व विकास समितीद्वारे केलेल्या पिकनिहाय संशोधन शिफारसी/तंत्रज्ञान (२००९ ते २०१८)

| पिकाचे नांव : ज्वारी | | |
|---|---|---|
| **लागवडी विषयी तंत्रज्ञान व शिफारसी :** | | |
| **वर्ष** | **अं.क्र.** | **शिफारस** |
| २०१८ | १ | विदर्भातील मध्यम ते भारी जमिनीवर खरीप ज्वारीपासून जास्त उत्पादन व उत्पन्न मिळविण्यासाठी तसेच जमिनीतील ओलावा टिकविण्यासाठी ज्वारीची लागवड ट्रॅक्टरद्वारे चार ओळी १.५ मिटर रुंद वरंबा सरी पध्दतीने ४५ सें.मी. वर करण्याची शिफारस करण्यात येत आहे. |
| **खत व्यवस्थापनाबद्यल शिफारसी** | | |
| **वर्ष** | **अं.क्र.** | **शिफारस** |
| २००९ | १ | ज्वारी-हरभरा या ओलीताखालील पीक पध्दतीत अधिकतम आर्थिक मिळकत, शाश्वत उत्पादन व जमिनीची सुपीकता वाढविण्याकरिता ज्वारीला हेक्टरी ५ टन शेणखत व ७५ टक्के शिफारसीत रासायनिक खत (६०:३०:३० नत्र:स्फुरद:पालाश किलो प्रति हेक्टरी) या सोबत ॲझोटोबॅक्टर व पीएसबी खताची (प्रत्येकी २५० ग्रॅम प्रति १० किलो बियाणे) बिज प्रक्रिया तसेच हरभ-याला ७५ टक्के शिफारसीत रासायनिक खत (१९:३८:०० नत्र:स्फुरद किलो प्रति हेक्टरी) सोबत रायझोबियम व पीएसबी खताची (प्रत्येकी २५० ग्रॅम प्रति १० किलो बियाणे) बिज प्रक्रिया करण्याची शिफारस करण्यात येत आहे. |
| २०१४ | १ | ज्वारी पिकासाठी मध्यम खोल काळ्या जमिनीतील पालाशचे प्रमाण ३३० किलो प्रति हेक्टर आणि वाढीच्या वेळेस पिकातील पालाशचे प्रमाण २.६० टक्के या सिमांत मर्यादा वापरुन पालाशचा वापर करण्याची शैक्षणिकदृष्ट्या शिफारस करण्यात येत आहे. |
| २०१६ | १ | खरीप ज्वारी-रब्बी हरभरा या पिक पध्दतीमध्ये जास्तीत जास्त उत्पादन, नफा व जमिनीची सुपीकता टिकविण्यासाठी खरीपातील ज्वारीला १०० टक्के (८०:४०:४० नत्र स्फुरद व पालाश कि/हे) शिफारशीत खतांच्या मात्रे शेणखतामधुन (२.५ टन) आणि पीएसबी व अझोस्पॅरिलम (२० ग्रॅम प्रति किलो बियाणे) ची बिज प्रक्रीया देऊन त्यानंतर शिफारसीत खतमात्रे शिवाय रब्बी हरभरा घेण्याची शिफारस करण्यात येत आहे. |
| २०१६ | २ | कोरडवाहू ज्वारी पिकामध्ये पावसाच्या पाण्याची अधिक कार्यक्षमता, उत्पादकता तथा जमिनीची सुपिकता सुधारण्यासाठी कमी मशागत (एक डवरणी नंतर निंदण) व पेरणीच्या वेळी २०:४०:४० नत्र,स्फुरद व पालाश/हे. रासायनिक खताद्वारे व २० कि लो नत्र शेणखताद्वारे(३.८टन/हे) आणि उर्वरीत २० किलो नत्र रासायनिक खताद्वारे आणि २० किलो गिरीपुष्पाच्या पाल्याद्वारे (३ टन/हे) ३० दिवसानंतर टाकण्याची शिफारस करण्यात येते आहे. |
| **पाणी व्यवस्थानाबद्यल शिफारसी :** | | |
| **वर्ष** | **अं.क्र.** | **शिफारस** |
| - | - | - |

| किड व रोग व्यवस्थापनाबद्यल शिफारसी | | |
|---|---|---|
| **वर्ष** | **अं.क्र.** | **शिफारस** |
| २०१० | १ | रबी ज्वारीवरील खोडमाशीचे परिणामकारक व्यवस्थापन तसेच धान्याचे जास्तीत जास्त उत्पादन मिळण्यासाठी बियाण्यास किटकनाशकाची बिजक्रिया केली नसल्यास, कार्बोफ्युरॉन ३ जी, १५ किलो प्रति हेक्टर पेरणीचे वेळी जमिनीतून देण्याची शिफारस करण्यात येते. |
| **काढणी पश्चात व्यवस्थापनाबद्यल शिफारसी** | | |
| **वर्ष** | **अं.क्र.** | **शिफारस** |
| २०१४ | १ | त्वरित आंबील करण्याकरीता शिजविण्यासाठी तयार आंबील भुकटी तसेच सांडोळी आणि बिबडी या ज्वारी पापड तयार करण्याच्या तंत्रज्ञानाची शिफारस करण्यात येते. |
| २०१४ | २ | ज्वारीचे पापड करण्याकरिता डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, विकसीत पापड कापणी यंत्राची शिफारस करण्यात येत आहे. |
| **पीक व्यवस्थापनाबद्यल इतर शिफारसी** | | |
| **वर्ष** | **अं.क्र.** | **शिफारस** |
| - | - | - |